# अध्याय ५१ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।।

दुसऱ्या दिनीं श्रीगुरूसी। सावित्री सांगे पूर्व कथेसी ॥
भक्तिभाव गुरपदांसी। जाणून गुरु हर्षित ॥१॥

सांगती आम्हीच येऊन। भक्तीसाठीं दिलें दर्शन ॥
कथिलें तुला योग्य ज्ञान। भक्ता तारक श्रीगुरु ॥२॥

जे माझ्यावरी विश्वासती। त्यांची मला अपार प्रीती ॥
पापाचें फळ जी दु:स्थिती। त्यांतून तारितों भक्तांना ॥३॥

रुद्राक्षमहिमा असे थोर। अैक आख्यान मनोहर ॥
रतिसम वेश्या सुंदर। पूर्वीं नंदीग्रामीं असे ॥४॥

ती महानंदा गुणवती। म्हणवी पतिव्रता सती ॥
ज्या दिवस देतसे ती। तेव्हान त्यासी एकनिष्ठ ॥५॥

तिची परीक्षा घ्यावयासी। शंकर गेले तिच्या गृहासी ॥
शिवव्रती धनिक हस्तासी । रत्नखचित लिंग असे ॥६॥

वेश्या पुसे दासीकडून। लिंग द्यावें मजलागून ॥
मग देईन पुष्कळ धन। किंवा पत्नी तीन दिवस ॥७॥

लिंग तेजस्वी मनोहर । वेश्या मोहून गेली फार ॥
उत्तर देई वैश्य नर। लिंग देईन सतीधर्मा ॥८॥

दोघांचा संकेत ठरला। त्यामुळें रतिसुखसोहळा ॥
करण्याचा वेध लागला। पोंचलीं अंतर्गृहांत ॥९॥

महानंदे वैश्य सांगत। लिंग दिव्य फार असत ॥
पवित्र जागीं ठेव त्याप्रत। भोगवेळीं जवळ नको ॥१०॥

जरी हानि होईल यासी। तर अर्पण प्राण शिवासी ॥
अैकून नाट्यमंडपासी। ठेवी जपून लिंग वेश्या ॥११॥

रतिक्रीडा भाव बहुत। सुंदर वेश्या वैश्या दावित ॥
रति प्रसंगीं अकस्मात। मंडपा अग्नि लागला ॥१२॥



सकळ जन विझविती। परंतु उपाय न चालती ॥
अग्निज्वाळा घोर भडकती। नाट्य मंडप भस्म झाला ॥१३॥

लिंग वैश्याचें गेलें जळून। त्यामुळें गळे वैश्यमन ॥
प्राण त्यजी आकांत करून। महानंदा चिंतीं पडे ॥१४॥

म्हणे कटकटा काय झालें। पुरुषहत्त्या पाप घडलें ॥
सती जाणें प्राप्त जाहलें। तशी सिद्धता सर्व करी ॥१५॥

आप्त इष्ट तिसी वारिती। कैसा पुरुष कैसी सती ॥
ती म्हणे शंका नको चित्तीं । तीन दिवस मी भार्या ॥१६॥

तसें पाहिजे आचरण। सती धर्म देई मरण ॥
त्यामुळें लाभे अपार पुण्य। चिंता-शोक न करावा ॥१७॥

बत्तीस लक्षणी पद्मीण। दानधर्मे तोषवी ब्राह्मण ॥
पतिनिष्ठ अंत:करण। उडी अग्नींत टाकिली ॥१८॥

पंचमुखीं उमाशंकर। प्रकटे आरूढ नंदीवर ॥
तिला धरिलें वरचेवर। अग्नीही शांत होतसे ॥१९॥

सांगे प्रेमे महानंदेस। मीच धनिक परीक्षेस ॥
पातलों पाळिलें वचनास। लिंग माझेंच स्वयंभू ॥२०॥

माया-अग्नि शांत झाला। माग हवें तें देतों तुला ॥
वेश्या नमून चरणांला। म्हणे सर्व सौख्य आहे ॥२१॥

माझे आप्त इष्ट असती। दासदासी सकळां प्रती ॥
संतोषें न्यावे स्वर्गाप्रती। तुम्हां सेवून राहूं तिथें ॥२२॥

शिव पुरवी इष्टकामना। भावें ईश्वर तारी जना ॥
त्याच्या पदीं ठेवणें मना। हेंच नरजन्म-सार्थक ॥२३॥

एक घडलें तये वेळ। नाट्य मंडपात नवल ॥
पाळिले करण्या नृत्य-खेळ। कुक्कुट-मर्कट वेश्येनें ॥२४॥

रुद्राक्ष असती कंठांत। दोघां मरण झालें प्राप्त ॥
रुद्राक्षपुण्य बळवंत। पावले जन्म राजकुळीं ॥२५॥



काश्मीर-राजा भद्रसेन। मर्कट झाला राजनंदन ॥
कुक्कुट होतसे जन्मून। प्रधान-पुत्र त्या राज्यीं ॥२६॥

नाना प्रकारचे रुद्राक्ष। पापतापनाशनीं दक्ष ॥
त्यांना मानून शिव प्रत्यक्ष। आनंदें पूजन करावें ॥२७॥

रुद्राक्ष-धारणाचें पुण्य। अनंत जाणावें अगण्य ॥
तीर्थ-क्षेत्रत्वा पावे अरण्य। रुद्राक्ष-महिमा न वर्णवे ॥२८॥

म्हणून काल रुद्राक्ष देत। दत्तसावित्री आनंदत ॥
श्रीगुरू आशीर्वाद देत। सर्वां नमन प्रेमभरें ॥२९॥

सदा दत्ता शरण जावें। सांभाळोनी राखा म्हणावें ॥
आपुल्यावीण कोण बरवें। करील असे विनविणें ॥३०॥

श्रीपाद श्रीवल्लभमूर्ती। श्रीनरसिंह सरस्वती ॥
त्यांना भक्त-कळकळ अती। तारिती संकटीं भक्तीनें ॥३१॥

गुरु पाहती सदाभाव। भाव तेथें उभा गुरुदेव ॥
भक्त हेंच गुरु-वैभव। भक्त-वैभव श्रीगुरु ॥३२॥

संकट मोठें जरी घोर। तरी तारितो गुरुवर ॥
श्रीगुरुदेवा नमस्कार। असो नित्य भावबळें ॥३३॥

सती गुरूला विनवीत। आपल्या कृपें प्राण परत ॥
रुद्राभिषेक-तीर्थे येत। महात्म्य थोर दिसतसे ॥३४॥

श्रीगुरु आनंदें सांगती। पराशर सर्वत्र फिरती ॥
पाहून काश्मीर नृपति। स्वागत उत्तम करीतसे ॥३५॥

सुधर्मा भ्रदसेन-सुत। तारक नामा प्रधान-सुत ॥
अेकमेकां अपार प्रीत। सहविचारें वर्तती ॥३६॥

प्रियरुद्राक्ष भस्मलेपन। नावडे अलंकार भूषण ॥
राजा विनवी ऋषिकारण। काय नशिबीं यांच्या असे ॥३७॥

ऋषि पराशर सांगती। पूर्व जन्माची सर्व माहिती ॥
पुन्हां पुसतसे नृपती। भविष्य मुलाचें सांगावें ॥३८॥

ऋषि सांगती तें ऐकून। शीण पावसी दुःखी मन ॥
राजा म्हणे मज त्यांतून। तूंच तारिसी मुनिराया ॥३९॥

तरी स्पष्ट सर्व सांगून। कथन करावें निरसन ॥
ऋषि म्हणे अष्टम दिन। मृत्यु आणील सुधर्मासी ॥४०॥

दहा सहस्त्र रुद्रावर्तन। इक्षुरसें अभिषेकून ॥
शिवप्रिय जलधारा स्नान। भक्तीनें पूजन करावें ॥४१॥

त्यामुळें शंकर प्रसन्न। पूर्णायुषी होईल नंदन ॥
सिद्धता करी भद्रसेन। विप्र पूजना बसविले ॥४२॥

अभिषेक जलतीर्थस्नान। करी नित्य राजनंदन ॥
भवानीशंकरा ध्यावून। राज-कुटुंब रहातसे ॥४३॥

नेमिल्या दिनीं आलें मरण। मंत्राक्षता टाकिती ब्राह्मण ॥
सुप्रसन्न उमारमण। बाळ उठून बैसला ॥४४॥

सर्व जनां आनंद होत। नारद आले अकस्मात ॥
राजा उत्तम सत्कारित। म्हणे विशेष सांगावें ॥४५॥

नारद सांगती कुमार। वांचविती ऋषि पराशर ॥
यमदूत अति प्रखर। नेती प्राण सुधर्माचा ॥४६॥

शिवदूत गेले धांवून। यमदूतां पराभवून ॥
प्राण आणितां संतापून। यमधर्म तेथें पातला ॥४७॥

वीरभद्र म्हणे कोपून। पूर्णायुषी राजनंदन ॥
चित्रगुप्तास पाचारून। यम आयुष्य विचारी ॥४८॥

तो सांगे पत्र उघडून। बारा वर्षांनीं अवसान ॥
परंतु तेथे असे लेखन। पूर्णायुष्य राजपुत्रा ॥४९॥

यम सांगे ममापराध। जातो आतां आंवरा क्रोध ॥
राजा शिवकृपा अगाध। रुद्रमहात्म्य थोर असे ॥५०॥

भद्रसेन उचंबळत। समारंभ झाला बहुत ॥
ऋषिब्राह्मणां प्रणिपात। नारदासह शिवा करी ॥५१॥



राजास मिळे आशीर्वचन। सुधर्मा शिवभक्त होऊन ॥
करील राज्य धर्म पाळून। होईल उद्धार शेवटीं ॥५२॥

ऐकून प्राचीन आख्यान। सावित्री दत्त करिती नमन ॥
रुद्राक्ष-रुद्र-महिमान। धन्य तारक गुरुकृपा ॥५३॥

सर्वां असो भावें नमन। सती विनवी गुरूलागून ॥
कांहीं सांगा मंत्र-साधन। चित्त राहण्या तव पायीं ॥५४॥

गुरु म्हणती मंत्र स्त्रियांस। देतां हानि होत मंत्रास ॥
कच-देवयानी कथेस। सांगती गुरु प्रेमानें ॥५५॥

मग सावित्री पुसतसे। गुरुराया वागावें कसें ॥
गुरु सांगती कर विश्वासें। सोमवार व्रत थोर ॥५६॥

नित्यानंद शांत शंकर। भक्तां देई अभीष्ट वर ॥
विरक्त वा विषयातुर। सर्वांनीं व्रत आचरावें ॥५७॥

अहेवपण होई स्थिर। चिंता न राही तसूभर ॥
भोळा सांब उमाशंकर। भक्तांस नित्य संरक्षी ॥५८॥

आर्यावर्ता भूपति अेक। पराक्रमी बहु धार्मिक ॥
चित्रवर्मा सपत्नीक। संततीसाठीं पूजी शिवा ॥५९॥

मनोहर कन्या जन्मली। जातक ज्योतिषी त्यावेळीं ॥
सांगती दुहिता महाभली। भाग्यवंत गुणराशी ॥६०॥

पूर्णायुषी सौभाग्यवती। मिळेल पराक्रमी पती ॥
एकमेकांसी फार प्रीती। कीर्ति अनंत वाढेल ॥६१॥

भविष्य मुलीचें अैकतां। संतोषी झाले मातापिता ॥
गणक-गौरव बहुता। करी राजा सहजची ॥६२॥

ज्योतिषी गोडवार्ता सांगती। परी अेक विप्र कथिती ॥
अनिष्ट योग राजाप्रती। कांहीं उपाय करावया ॥६३॥

त्या काळीं लग्नें लवकर। विप्राचें भविष्य उत्तर ॥
हिचा नष्ट होईल वर। चौदा वयांत भूपते ॥६४॥

श्री दत्तचरित्रसार अध्याय ५१ वा

सर्व काळजींत पडले। म्हणती उपाय करूं भले ॥
सीमंतिनी नांव ठेविलें। कन्या वाढली राजगृहीं ॥६५॥

परंतु राजकुटुंब झुरत। एके दिवशीं राजगृहांत ॥
याज्ञवल्क्य-पत्नी येत। मैत्रेयीस प्रश्न झाला ॥६६॥

ती सोमवार व्रत सांगत। प्रदोषीं पूजावा उमाकांत ॥
सर्व निरसेल नको भ्रांत। येथे सुख अंतीं गति ॥६७॥

अभिषेकें पापक्षय। पीठ पूजितां साम्राज्य ॥
सुख-सौभाग्य पुष्पमाल्य। गंधाक्षता बिल्वार्चनें ॥६८॥

धूपानें कीर्ति पसरणें। दीप-दानें कांति मिळणें ॥
सर्व भोग नैवेद्य अर्पणें। तांबूल लक्ष्मी स्थिर करी ॥६९॥

भावें करितां नमस्कार। साधती पुरुषार्थ चार ॥
जप करितां मनें एकाग्र। अष्टैश्वर्यें नांदती ॥७०॥

होमें सर्व कोश पूर्ण। स्तवनें समृद्धि संपूर्ण ॥
करवितां ब्राह्मण-भोजन। सर्व देवता तृप्त होती ॥७१॥

त्यापरी सीमंतिनी आचरी। राव तिचा विवाह करी ॥
अर्पिली चंद्रांगदा कुमारी। नल-दमयंती वंशजा ॥७२॥

राजैश्वर्यें लग्न-सोहळा। जामाता कौतुकें ठेविला ॥
तो क्रीडा करण्यास गेला। कालिंदी नदींत मित्रांसह ॥७३॥

परी दुर्दैव झाले बळी। चंद्रांगद बुडाला जळीं ॥
नावेकरी शोध त्यावेळीं। करिती पण पत्ता नसे ॥७४॥

राजकुटुंबीं आकांत थोर। इंद्रसेन येत सत्वर ॥
पुत्रासाठीं शोक अपार। सीमंतिनी तेजहीन ॥७५॥

प्रधानदि करिती सांत्वन। प्रेत सांपडल्यावांचून ॥
सीमंतिनीचें सहगमन। न घडे म्हणून व्रत चालू ॥७६॥

सीमंतिनी राहिली माहेरीं। इंद्रसेन गेला स्वनगरीं ॥
दायाद साधिती संधि पुरी। राजा राणी तुरुंगांत ॥७७॥

श्री दत्तचरित्रसार अध्याय ५१ वा

इकडे झालें वर्तमान। चंद्रांगद गेला बुडून ॥
नशीब त्याचें बलवान। धन्य कृपा शंकराची ॥७८॥

नागकन्या देखती त्यासी। आणि नेती तक्षकापासीं ॥
तो विचारी चंद्रांगदासी। सांग कोण तूं नको भिऊं ॥७९॥

तो सांगत आपलें वृत्त। तक्षक तया अभय देत ॥
सुखें रहावें पाताळांत। अमृतभोग भोग इथें ॥८०॥

चंद्रांगद नमून वदत। भार्येकडे गुंतलें चित्त ॥
आईबापही शोकसंतप्त। भेट माझी त्यां करवा ॥८१॥

तक्षक बोले संतोषून। कांहीं काळ घेत ठेवून ॥
वस्त्रें भूषणें अपार धन। देऊन धाडी पुत्रासह ॥८२॥

जेथें बुडाला होता नदींत। तेथें पातला अकस्मात ॥
त्या दिनीं सोमवार व्रत। स्नाना सीमंतिनी आलीसे ॥८३॥

गळसरी नाहीं गळ्यांत। सौभाग्य तिलक न दिसत ॥
काय पत्नीची झाली गत। विचारी तिला कोण तूं ॥८४॥

सीमंतिनी ओळखी त्यास। पण न वाटला विश्वास ॥
सखीजन राजपुत्रास। सांगती वार्ता सर्वही ॥८५॥

राजपुत्र कथी पत्नीस। नको चिंता स्वस्थ मानस ॥
उजाडतां तिसरा दिवस। पति दिसेल तुजलागीं ॥८६॥

आणि जातसे स्वराज्यांत । शत्रूस सांगून धाडीत ॥
तुम्ही केलासे स्वामीघात। चूक दुरुस्त करावी ॥८७॥

नातरी करीन प्राणघात। शत्रु भिऊन शरणागत ॥
इंद्रसेना राज्यीं स्थापित। भेट संतोषें जाहली ॥८८॥

कल्पवृक्षफळें अर्पित। तशा तक्षकभेटी बहुत ॥
राजा राणी उचंबळत। म्हणती धन्य शेष राजा ॥८९॥

त्याच्या मुलास गौरवून। धाडिलें आनंदें परतून ॥
तक्षकाचें आशीर्वचन। स्मरणेंच सिद्धि कार्याची ॥९०॥



चित्रवर्मा आर्यावर्तास। शुभवार्ता कळविली त्यास ॥
परत करून लग्नास। सीमंतिनी सौभाग्यवती ॥९१॥

चंद्रांगद पत्नीस देत। पाताळींची अमूल्य वस्तू ॥
उपमा नसे त्रैलोक्यांत। सीमंतिनी सुखी झाली ॥९२॥

उभय राजकुळें हर्षित। उमाशंकर कृपा अमित ॥
सोमवार व्रत अत्यंत। आवडे भवानीशंकरा ॥९३॥

दत्तसावित्रीस सांगून। गुरु देती आशीर्वचन ॥
माहुरक्षेत्रीं घरीं जाऊन । सौख्यऐश्वर्य भोगिती ॥९४॥

प्रतिवर्षीं गाणगापुरास। येऊन पूजिती श्रीगुरुस ॥
सदा लीन गुरुपदांस। असणें लक्षण भाग्याचें ॥९५॥

सावित्रीदत्ताचें आख्यान। निवारी दोषही महान ॥
सोमवार व्रत महिमान। यथातथ्य कोण वर्णी ॥९६॥

जप तप व्रत आचरून। ईश्वरनिष्ठ होतसे मन ॥
दुर्दैव जातसे वितळून। ईश्वरी कृपा अतर्क्य ॥९७॥

शंकर विष्णु ब्रह्मदेव। तेच श्रीगुरुदत्त देव ॥
नानापरी बोधून जीव। धर्ममार्गे सुखी करी ॥९८॥

सर्वांतर्यामी एकतत्त्व। तसा पाहिजे भाव सतत ॥
छलन कवणाचें नसत। तर ती प्रगति उत्तम ॥९९॥

दत्ता तुझें चरित्र गहन। तव पदीं असो माझें मन ॥
अध्याय हा एकावन्न। नमून अर्पण दत्तपदीं ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु



## अध्याय ५२ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्‌गुरवे नम:॥

श्रीगुरुदत्ता तूं दयाळ। तुझ्या कृपेनें येती बोल ॥
तव पदीं भाव अढळ। असो देवा गुरुराया ॥१॥

विश्वावर सत्ता अढळ। कोण्या वेळीं काय कराल ॥
तुम्हांविणें कोण जाणील। नमन असो तव पायीं ॥२॥

श्रीगुरुपदीं भक्त येती। समाराधना नित्य करिती ॥
सुरस पक्वान्नें लाभती। ब्राह्मण तृप्त स्त्रियांसह ॥३॥

अेक ब्राह्मण वेदरत। कर्ममार्ग आचरे सतत ॥
नित्य कोरडी भिक्षा घेत। परान्नभोजन वर्ज्य करी ॥४॥

घरची गरिबी पाहून। सदा उदास भार्यामन ॥
इतर ब्राह्मण स्त्री जन । मिष्टान्न रोज जेविती ॥५॥

घरीं येऊन स्तुति करिती। त्यामुळें ती कष्टी अती ॥
विप्रदंपत्य बोलाविती। परंतु पति न जातसे ॥६॥

असें म्हणून सदा कष्टत। अेकदां एक विप्र श्रीमंत ॥
पक्षश्राद्ध करण्या येत। आमंत्री या द्विजवरा ॥७॥

परी आनंदें तो नाकारी। द्विजभार्या विचार करी ॥
सुग्रास अन्न दक्षिणा भारी। आम्हास कशी मिळणार ॥८॥

गुरुचरणी घेई धांव। सांगे तळमळे माझा जीव ॥
सदा निरिच्छ पतिदेव। गुरुराया उपाय सांगा ॥९॥

विप्रा गुरु निरोप देती। गुरुआज्ञा सर्व पाळिती ॥
त्यामुळें जाय विप्रदंपती। पक्षश्राद्ध भोजनाला ॥१०॥

पितृगण नाना योनींत। जन्म पावती सदोदित ॥
श्राद्धान्न त्यांना करी तृप्त। जनार्दनवासुदवेकृपें ॥११॥

ब्राह्मणीस तेथें दिसती। श्वानसूकर संगें जेविती ॥
पतिसह झाली निघती। तिचें मन कंटाळलें ॥१२॥

श्रीगुरु चरणीं येऊन। विप्र दंपत्य करी नमन ॥
गुरु म्हणती आतां मन। संतुष्ट राख पतिवचनीं ॥१३॥

तिची पटली समजूत। परान्नाला विटलें चित्त ॥
पतिदेवा नमस्कारीत। गुरूला स्तवी क्षमा करा ॥१४॥

विप्र सांगत श्रीगुरुसी। भार्येमुळें आपर दोषी ॥
गुरु वदती दोष तुजसी।नाहीं निश्चिंत रहावें ॥१५॥

तव पत्नी सदा मानसीं। असंतुष्ट तव वृत्तीसी ॥
आतां मर्म कळे तिजसी। राहील चित्त तुझ्यासम ॥१६॥

कुलस्त्रियेचें सदा मन। नसावें उद्वेगी उदासीन ॥
म्हणून तुला आज्ञापून। धाडिलें श्राद्धा भिऊं नको ॥१७॥

पुन्हा विप्र पुसे गुरूसी। कसे वागावें सांगा मजसी ॥
गुरु म्हणती अडे कर्मासी। तेथें जावें तुवां सुखें ॥१८॥

दोष असे सर्व कर्मात। तूं सर्वदा ब्रह्मकर्मांत ॥
गढून जासी नसावी खंत। गायत्रीजप पाप नाशी ॥१९॥

ब्राह्मण पुन्हां विचारीत। सांगा आचार मजप्रत ॥
गुरु प्रेमें त्यासी म्हणत। यज्ञसत्र नैमिषारण्यीं ॥२०॥

तेथें ब्रह्मर्षि पराशर। गेले असतां ऋषिवर ॥
करिती आदर नमस्कार। पुसती आचार विप्रांचा ॥२१॥

पराशर त्यांना सांगती। पहाटेस श्रीगुरुमूर्ती ॥
देवता तीर्थें क्षेत्रें चित्तीं। स्मरून उठावें शुद्ध मनें ॥२२॥

देहशुद्धि मुखमार्जन। आगमोक्त कांहीं म्हणून ॥
मंत्रोच्चारें स्नान करून। निर्मळ वस्त्र नेसावें ॥२३॥

पवित्र दर्भासनीं बसून। केशवादि नामोच्चारण ॥
आचमन सप्तलोकस्मरण। प्राणायाम यथाविधि ॥२४॥

उपवस्त्र असावें जवळ। कंठीं रुद्राक्षांची माळ ॥
भस्मलेपन त्रिपुंड्रभाळ। गोपचंदनही शुभ ॥२५॥



संध्याविधि आरंभून। सूर्योदयीं अर्घ्यप्रदान ॥
न्यासादिकानंतर ध्यान। गायत्री जप करावा ॥२६॥

सूर्यस्तुति वेदस्मरण। सर्वही परमेश्वरार्पण ॥
साडग करी विष्णुस्मरण। निर्मम आपण असावेसाङग ॥२७॥

वेदपठण देवतापूजन। मूर्ति किंवा मानसीं ध्यान ॥
सूर्य अग्नि जल पूजन। परमेश्वरा प्रिय आहे ॥२८॥

देव ऋषि पितृ तर्पण। वैश्वदेव बलिहरण ॥
अग्नीस आहुति देऊन। बाहेर ठेवणें काकबलि ॥२९॥

पंच महायज्ञ करून। शास्त्रशुद्ध अन्न सेवून ॥
तिन्ही काळीं संध्या करून। वेदाध्ययन साधावें ॥३०॥

गणपति शंकर भवानी। भास्कर विष्णु पंचायतनीं ॥
पाषाणादिक मूर्तिपूजनीं। सोळा उपचार अर्पावे ॥३१॥

सर्वांतर्यामी भगवान। विश्वात्मक देवचिंतन ॥
निर्गुणरूपें क्लेश म्हणून। सगुण पूजन रूढ असे ॥३२॥

मूर्तींत सर्व सामावून। भावें करावें लीन मन ॥
मग साक्षात्कार घडून। विश्वात्मकवृत्ती बने ॥३३॥

वेदाध्ययन अध्यापन। यज्ञ करून करवून ॥
दान घेणें करणें दान। ब्रह्मार्पण सर्व करणे ॥३४॥

सर्वत्र सूर्यआवरण। बुद्धीस चेतना करून ॥
सदा करवीतसे वर्तन। त्या एकनिष्ठ असावें ॥३५॥

भगवंत जसा ठेवील। त्यांत संतुष्ट सदाकाळ ॥
शमदम वृत्ति सरळ। शुद्धि शांति असावी ॥३६॥

तपस्विता निरिच्छ मन। कर्मांत समता वर्तन ॥
अनुभवून ज्ञान विज्ञान। प्रायोगिक वृत्ति हवी ॥३७॥

कर्ता करविता ईश्वर। संधि साधून निरंतर ॥
स्वकर्मानें परमेश्वर। संतुष्ट करावा सर्वदा ॥३८॥



अन्नासम शरीर सत्त्व। योग्य वेळीं अन्न उचित ॥
विधायक कर्मे मिळत। अशी द्रव्य प्राप्ति शुभ ॥३९॥

आपोआप मिळे संपत्ति। तरी ही हवी सत्पथरीती ॥
शरीर वाणी मनोवृत्ति। परोपकारीच पाहिजे ॥४०॥

विध्वंसक वाद टाळून। ईश्वरनिष्ठ नित्य राहून ॥
वैदिक संस्कृति पाळून। निश्चिंतपणे असावें ॥४१॥

देवास प्रिय असे जन। ईश्वर रक्षी रात्रंदिन ॥
मालवतील दुष्ट दुर्जन। चिंता कांही न करावी ॥४२॥

श्रीमंतीस भुलूं नये। गरिबीस कंटाळू नये ॥
आचार प्रथम पाळितां ये। अंगीं सामर्थ्य धर्माचें ॥४३॥

देव ऋषि आणि पितर। यांचीं ऋणें आपणांवर ॥
यज्ञ अध्ययन कुमर। यांच्यामुळें तीं फिटतीं ॥४४॥

मनोमय लिंग शरीर । वासनामय निरंतर ॥
गुरुनिष्ठा करते पार। जीवा वासनेमधून ॥४५॥

संसार भोगतां अनासक्त। स्वर्गादि सर्व नाशवंत ॥
जाणून नरें व्हावें मुक्त। हेंच द्विज-धर्म-सार्थक ॥४६॥

अनुरूप कन्या पाहून। ग्रहतारा-विचारें लग्न ॥
संयमें संसार करून। वंश-वृद्धि साधावी ॥४७॥

नको वाईट कालमान। रेवती मघा अमा टाळून ॥
स्त्री-संग दे शुभ संतान। विचार सूक्ष्म पहावा ॥४८॥

सुगीवर धान्य पाहून। ठेविती बियास निवडून ॥
तसा योग्य विचार करून। घरीं बालकें रत्नापरी ॥४९॥

स्त्रियांच्या मासिक पाळीस। दोष असतो बहुवस ॥
अस्पर्श विश्रांति तीन दिवस। देवता-सांनिध्य नंतर ॥५०॥

अमा पौर्णिमा पर्व दिवस। रक्तप्रवाह जोरकस ॥
आकर्षण फार पृथ्वीस। वनस्पतीही दाविती ॥५१॥

अशावेळीं पोटांत त्रास। होऊं नये म्हणून दिवस ॥
शास्त्र सांगे ते उपवास। करून पाळणें हितकर ॥५२॥

एकादशी शिवरात्री प्रदोष। अष्टमीं पक्ष-मध्य दिवस ॥
विनायकी संकष्टी पाव पक्षास। नाना व्रतें सांगितलीं ॥५३॥

परिस्थिती व वय पाहून। लघु आहार शास्त्रप्रमाण ॥
ब्रह्मचर्य पूर्ण राखून। व्रत-पालन शुभ होई ॥५४॥

तिथि वार नक्षत्र योग। करण दावी शुद्ध पंचांग ॥
त्याच्या विचारें कार्यप्रसंग। इष्टानिष्ट फलदायी ॥५५॥

योग्य कार्य योग्य दिवस। मुहूर्त साधावा विशेष ॥
सृष्टीमधील साह्य कार्यास। मिळतां उत्कर्ष होतसे ॥५६॥

जों जों सांगावा विचार। तों तों सखोल बीजें फार ॥
पाहून संस्कृति व्यवहार। वागणें योग्य ईश-कृपें ॥५७॥

तंत्र मंत्र विधि पाळून। देवता होती सुप्रसन्न ॥
सुखाचा संसार होऊन। ईशपदीं निष्ठा बसे ॥५८॥

गुरु म्हणती पराशर। ब्रह्मर्षि सांगती आचार ॥
शास्त्रग्रंथीं असे विचार। त्याप्रमाणे वाग सदा ॥५९॥

रहावें आचार पाळून। होईल सुख समाधान ॥
लाभतांच आशीर्वचन। विप्र नमस्कार करी ॥६०॥

भार्येसह घरीं जातसे। आचार पाळून सुखी असे ॥
ऐकती विप्र तेही तसे। वागतां सौख्य पावती ॥६१॥

ईश्वराच्या शक्ति अनंत। त्या सकळ नरदेहांत ॥
चिमणें ब्रह्मांड हें असत। देव-चतुरता यांत दिसे ॥६२॥

नरजन्माचें प्रयोजन। मुख्य स्वरूपीं व्हावें लीन ॥
जन्म मृत्यु-फेरा चुकून। आत्मानंदीं रत व्हावें ॥६३॥

हठयोग ज्ञान ध्यान भक्ति। व निष्काम स्वकर्म रीती ॥
उत्तरोत्तर श्रेष्ठ असती। साधन संग्रह-दृष्टीनें ॥६४॥



नराचा होई नारायण। जरी मिळेल खरें ज्ञान ॥
तें मिळतें गुरु सेवून। असे सद्गुरु दत्तदेव ॥६५॥

लोकीं असती नाना गुरु। परी स्वरूप साक्षात्कारू ॥
तेच ईश्वरी अवतारू। जनां तारक नेहमीं ॥६६॥

सकळ जग ईश्वराचें। तोच चालवी बळें साचें ॥
सर्व कार्य असतें त्याचें। असें चित्तांत पाहिजे ॥६७॥

त्याला भावें नमस्कारून। न्यावें म्हणावें उद्धरून ॥
न्यायनीतींचें आचरण। समजेल तसें करावें ॥६८॥

आणि तें त्यालाच अर्पण। करून व्हावें निरभिमान ॥
कर्तव्य केल्याचें समाधान। निष्काम कर्मे लाभतें ॥६९॥

कर्मांत आसक्ति नसावी। ईशपदीं नित्य असावी ॥
असक्त कर्माची थोरवी। श्रेष्ठ असे, मुक्ति मिळे ॥७०॥

कर्ता करविता ईश्वर। त्यासी भजावें निरंतर ॥
श्रीगुरुदत्त दिगंबर। भक्तां तारिती सर्वदा ॥७१॥

सदा ध्यानीं धरावा दत्त। मग तो होई जीवन्मुक्त ॥
सूक्ष्मबुद्धि असल्या प्राप्त। ज्ञानमार्ग सुलभ असे ॥७२॥

वेदोक्त कर्म आचरून। शुद्ध होतें अंत:करण ॥
तेथेंच ईश्वराचें ज्ञान। होऊन कर्मव्याप संपे ॥७३॥

प्रकृति पुरुष तत्त्वें दोन। जग उत्पत्तीस कारण ॥
त्रिगुणी माया खेळ खेळून। रची पोषी नाशी जगा ॥७४॥

द्रवीं सम स्नेह दूरता। जास्त स्नेहें अणुघनता ॥
वायुरूपीं अणु-दूरता। ममता दूरता जगीं दिसे ॥७५॥

अष्टांग योगी श्रेष्ठ सबळ। हठयोगी दत्त दयाळ ॥
विविधपरी त्याचा खेळ। योग साध्य गुरुकृपें ॥७६॥

साक्षात्कारी गुरु तारील। नातरी भोगइच्छा वाढेल ॥
अंगीं ताठा फार चढेल। अधोगतीस कारण जो ॥७७॥



कसलेंही लाभले बळ। तरी असक्त सदाकाळ ॥
अशा भावें गुरु दयाळ। तारील सुखें नि:संशय ॥७८॥

साक्षात्कारी होत नावाडी। भवपार व्हावया होडी ॥
तयार ठेवी अैलथडी। पैल नेतसे मुक्तिपदा ॥७९॥

हा विचार मनांत घ्यावा। योग्य वाटल्या दत्त ध्यावा ॥
नाहीं तरी सोडून द्यावा। आग्रह नसे कोणाचा ॥८०॥

आई वाढते मुलां अन्न। जेवून होण्या तृप्त पूर्ण ॥
तिला दया येई म्हणून। बाळांस सांगे जेवा जेवा ॥८१॥

बाळ जरी सुखें जेवलें। आई बाळा सुख हो भलें ॥
जेवून तृप्त जीं जीं मुलें । तीं तीं अन्या सांगती ॥८२॥

संत साधु यांचें वचन। ईशभक्ति गोड जेवण ॥
नानापरी कष्ट साहून। मग तरी देवा स्मराल ना ॥८३॥

दत्त असे भक्तदयाळ। दत्ताचें हें जाणा सकळ ॥
दत्ता चिंतुनी सदा काळ। सुख भोगावें अक्षय ॥८४॥

जरी दत्तें कृपा करावी। दांभिकता सोडून द्यावी ॥
शुद्ध भावें कृपा बरवी। होत असते मनीं ठेवा ॥८५॥

शुद्ध मानस जरी असे। तरी पाप वाढत नसे ॥
जीव उन्नति पावतसे। भवपार सुखें तो होई ॥८६॥

दत्ता आम्ही अज्ञान दीन। शुद्ध करा आमचें मन ॥
सर्व सत्ता तुझी म्हणून। सुधारून घ्या अक्षय ॥८७॥

आपला देह जसा असे। तसाच राष्ट्रदेह असे ॥
चार पुरुषार्थ उत्तमसे। साधती तो धर्म खरा ॥८८॥

राष्ट्रीं असती नाना लोक। त्यांना इह पारलौकिक ॥
सुख पाहिजे निष्कंटक। परस्पर-पूरक नेहमीं ॥८९॥

विधायक हवा गोड ग्रास। अनुरूप हवा सहवास ॥
दैवी शक्ती हव्या साह्यास। सदा युक्त सुखासाठीं ॥९०॥

देव नर एकमेकांस। साह्य करिती बहुवस ॥
हेंच मूळ यज्ञकार्यास। पूरक त्याग परस्परां ॥९१॥

बुद्धि-शक्ति-धन-कष्टवृत्ति। चातुर्वर्ण्य गुणकर्म रीती ॥
कर्मविपाक दैवगति। स्वाधीन ठेवी दत्तगुरु ॥९२॥

अनंत ब्रह्मांडींचीं वस्ती। ईश्वर जाणे सर्व स्थिती ॥
सर्व सत्ता श्रीदत्त-हस्तीं। त्याला नमस्कार असो ॥९३॥

आपापलें काम करून। राष्ट्र ठेवावें बलवान ॥
आज्ञाधारी सेवकजन। राष्ट्र-रक्षणा उपयोगी ॥९४॥

जग चालवी परमेश्वर। त्याचीच भक्ति निरंतर ॥
करून रहावें भावें स्थिर। मग आदेश होतसे ॥९५॥

तसा करून उपदेश। जन-मनीं येत आवेश ॥
मग मिळतें सदा यश। प्रसन्न परमेश रहातसे ॥९६॥

सर्वही आचार विचार। जाणे एक परमेश्वर ॥
त्याच्याच कार्यीं कलेवर। चंदनासम झिजवावें ॥९७॥

मरण अथवा जीवन। सारखें मानी भक्त-मन ॥
श्रीदत्तदयाळु भगवान। इहपर सुखी राखितो ॥९८॥

दत्ता सर्व तुझीच लीला। विविध साधु या भूतला ॥
अंशकलेनें ज्या त्या काला। रक्षिती त्यांना नमस्कार ॥९९॥

श्रीगुरु दत्त दयाघन-। कृपेनें होतसे लेखन ॥
अध्याय संपूर्ण बावन्न। घेती निजकरीं आनंदें ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु



## अध्याय ५३ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।।

गुरुचरित्र ग्रंथ पावन । त्याला असो भावें नमन ॥
सिद्ध नामधारका प्रसन्न। असती त्यांना नमस्कार ॥१॥

नामधारका सिद्ध सांगती। तंतूक करी गुरुभक्ति ॥
एकदां यात्रेस निघती। मातापिता आप्त बंधु ॥२॥

माघ कृष्ण चतुर्दशी। श्री शैल्यपर्वत यात्रेसी ॥
मल्लिकार्जुन पूजनासी। लोक जाती प्रतिवर्षी ॥३॥

तंतुका स्वजन पुसती। तो सांगत सकळां प्रती ॥
मल्लिकार्जुन गुरुमूर्तीं। माझी यात्रा गुरुचरण ॥४॥

नित्य गुरूची सेवा करी। तो राहिला गाणगापुरीं ॥
गुरु एक मानी अंतरीं। शिवरात्रि दिन पातला ॥५॥

तंतुक गेला संगमासी। स्नान करून श्रीगुरूसी ॥
नमितां श्रीगुरु तयासी। म्हणती जाउया पर्वतीं ॥६॥

पादुकांना घट्ट धरावें। डोळे मिटुनी स्थिर रहावें ॥
तंतिक करी तसें भावें। श्रीगुरु गेले पर्वतासी ॥७॥

सांगती उघड आतां डोळे। विणकरी विस्मित त्यावेळे ॥
गुरु म्हणती विधि सगळे। करून ये जा लवकर ॥८॥

तीर्थांवर स्वजन सगळे। तंतिकास तेव्हां भेटले ॥
लपून येसी कां रे म्हणाले। सांगे आतां गुरु आणिती ॥९॥

जाऊ न शिवपूजन करी। गुरूच दिसती लिंगावरी ॥
भावें शंकरा नमस्कारी। येऊन सांगे श्रीगुरूला ॥१०॥

मल्लिकार्जुन आपण एक। कशास येथें येती लोक ॥
गुरु सांगती महिमा अैक । स्थानमहात्म्य थोर असे ॥११॥

शंकरभक्त विमर्षण। किरात देशा राजा जाण ॥
राणी कुमुद्वती नमून। एकदां पुसे पतिदेवा ॥१२॥



वल्लभा नका करूं कोप। संशय आहे मनीं खूप ॥
परदारा जोडतां पाप । अग्राह्य मांसही चालतें ॥१३॥

परी भावें शिवपूजन। श्रीमल्लिकार्जुनदर्शन ॥
शिवरात्रींचें उपोषण। कार्य कारण काय असे ॥१४॥

भूपति भार्ये करी कथन। मागील जन्मीं होतों श्वान ॥
तो स्वभाव मज अजून। येतसे मृत्यु शिवद्वारी ॥१५॥

शिवालयीं शिवरात्रीसी। यात्रा जमली मोद मानसीं ॥
कांहीं मिळेल खावयासी। म्हणून तेथें मी गेलों ॥१६॥

परंतु लोक पाठीं लागले। काष्ठ पाषाण मारिती बळें ॥
इकडे तिकडे मी पळें। दैवें घडल्या प्रदक्षिणा ॥१७॥

शिवालयांत पलायन। करितां घडे शिवदर्शन ॥
तेथेंच झालों गतप्राण। शिव संतुष्ट मजवरी ॥१८॥

शिवप्रसादें झालों राजा। भावें करितों शंकरपूजा ॥
पाहिलें दीपमाळ तेजा। म्हणून सुचलें हें ज्ञान ॥१९॥

मग कांता पुन्हां विचारी। मी कोण होतें जन्मांतरी ॥
राजा कथी तूं नभांतरी। कपोती फिरत होतीस ॥२०॥

मांसगोळा तव चोचींत। पाठलाग घार करीत ॥
तूं गेलीस पळत पळत। श्रीगिरीस पर्वतावरी ॥२१॥

प्रदक्षिणाकार भोंवसी। घार मारी सहज तुजसी ॥
प्रदक्षिणा पुण्यफळेंसी। राजपत्नी झालीस तूं ॥२२॥

भावी जन्म राणी विचारी। तो म्हणे आमची जोडी खरी ॥
सहा जन्म अगे सुंदरी। नाना देशीं राज्य करूं ॥२३॥

मग उपदेशा मी जाईन। अगस्ति ऋषीस शरण ॥
त्यांच्या कृपेनें उद्धरून। जाऊं आपण सुखानें ॥२४॥

त्याप्रमाणें आलें घडून। अैक तंतिका महिमान ॥
गाणगापुरी दिव्य स्थान। कल्लेश्वर संगमेश्वर ॥२५॥

त्यांना मान मल्लिकार्जुन। तंतीक म्हणे गुरुचरण ॥
साक्षात्कारी शिवदर्शन। कां मजला चाळवितां ॥२६॥

मग पुन्हां पूर्वीं समान। संगमीं आले दोघे निघून ॥
तंतिका दिलासे धाडून। गाणगापुरीं मठाकडे ॥२७॥

आज संगमीं राहाणार। तिकडे चलावें सत्वर ॥
असा निरोप लवकर। शिष्यां तंतिक सांगतसे ॥२८॥

परंतु शिष्य, ग्रामलोक। तंतिका पाहून कौतुक ॥
करिती म्हणती यात्रिक। कोठें आज बनलासी ॥२९॥

तो म्हणे मला गुरु नेती। वायु वेगें शैल्य पर्वतीं ॥
पंधरा दिवसांनी येती। यात्रिक सांगती सत्य कथा ॥३०॥

शिवरात्रीस त्या दिवशी। गुरु राहिले संगमासी ॥
आनंद अपार भक्तांसी। महोत्सव रात्रीं होतसे ॥३१॥

शिवरात्रीच्या पारण्यासी। कुष्टी विप्र श्रीगुरूपाशीं ॥
येऊन प्रार्थी सद्भावेसी। कृपा करावी मजवरी ॥३२॥

पूर्वीं देह चांगला असत। उतार वयांत कुष्ट होत ॥
तुळजापूर क्षेत्रीं जात। निष्ठेनें अनुष्ठान करी ॥३३॥

तेथें भवानीचा दृष्टांत। चंदला परमेश्वरी क्षेत्रांत ॥
जाऊन भजावें तसा जात। निष्ठेनें अनुष्ठान करी ॥३४॥

तेथें देवीचा दृष्टांत झाला। तूं जावें गाणगापुराला ॥
तेथें श्रीगुरु राहिला। अवतार श्रेष्ठ देवाचा ॥३५॥

तरी ब्राह्मण गेला नाहीं। मग परत निरोप होई ॥
तसा भोपे लोकांस पाहीं। आदेश स्वप्नीं देवीचा ॥३६॥

ते सांगती त्या ब्राह्मणासी। न करी छलन गा देवीसी ॥
जरी येथून आतां न जासी। देवालयांत न घेऊं ॥३७॥

देवीस नमून निघाला। नरापाशीं गाणगापुराला ॥
गुरु म्हणती त्या विप्राला। किमर्थ येसी नराकडे ॥३८॥



मनींची खूण त्याला पटली। गुरुपदीं निष्ठा बसली ॥
आळवी गुरुला तये वेळीं। दयाळु गुरु कळवळले ॥३९॥

सांगती संगमीं घाला स्नान। वस्त्रें टाका दूर नेऊन ॥
नवीं वस्त्रे यास देऊन। आणा सत्वर भोजना ॥४०॥

त्यापरी व्यवस्था होतसे। सर्वांग निर्मळ झालेंसे ॥
नंदीनामा हर्षें येतसे। गुरुला नमी अनन्य ॥४१॥

गुरु म्हणती सूक्ष्म पाहून। सांग सत्वर तें ऐकून ॥
प्रार्थी जंघेवरी खूण। दयाळा तीही जाऊंदे ॥४२॥

नरशंकेने तूं आलासी। म्हणून राहिलें जंघेसी ॥
कवित्व करावें यावेळेसी। मग जाईल गुरु सांगती ॥४३॥

तो म्हणे नाही कवित्वशक्ति। गुरु मुखीं विभूति घालिती ॥
आली विप्रा कवित्वस्फूर्ति। गर्भापासून दुःख वदे ॥४४॥

एेका गुरुशिवाय अन्य। तारक नाहीं तरी अनन्य ॥
भजा भजा हो सकळजन। त्रैमूर्तिचरण गुरूचे ॥४५॥

शंका त्याची समूळ गेली। गुरुस्तुति लोकां आवडली ॥
जंघा तत्काळ बरी झाली। पारणा उत्तम होतसे ॥४६॥

नंदीनामा कवित्व करी। लोक शिकले भराभरी ॥
जिकडे तिकडे भक्तवैखरी। पसरून भक्ति वाढतसे ॥४७॥

गुरु असतां गाणगापुरीं। सोमनाथ ब्राह्मणनारी ॥
गंगा भाविक वांझ म्हातारी। नित्य दर्शना येतसे ॥४८॥

नीरांजन ओवाळी गुरूस। भाग्य येतसे उदयास ॥
एकदा गुरु त्या वृद्धेस। काय हवें विचारिती ॥४९॥

ती म्हणाली भावें नमूनी। पुत्रवासना फार मनीं ॥
साठ वर्षे मजलागोनी। अपत्य नाहीं देखिलें ॥५०॥

तरी मला जन्मीं पुढील। उभयवंश उद्धरील ॥
असा पुत्र सद्गुणी बाळ। व्हावा देवा गुरुराया ॥५१॥



सांगती लोक अश्वत्थासी। सेवा केल्या पुत्र पावसी ॥
आजवरी मी पिंपळासी। सेवा केली पुत्र कम्यें ॥५२॥

तिला मग गुरु सांगती। भावी जन्म कोण जाणती ॥
याच जन्मीं तुजला होती। कन्या पुत्र निश्चयानें ॥५३॥

हें एकतां गुरुवचन। म्हणे पदरीं गांठ बांधून ॥
असत्य झाल्यास वचन। हांसें होईल गुरुराया ॥५४॥

वरद कन्यापुत्र देसी। अश्वत्थ सेवावा कशासी ॥
निश्चय तव वचनासी। शकुनगांठी बांधिली म्यां ॥५५॥

गुरु म्हणती ब्राह्मणीसी। महिमा थोर अश्वत्थासी ॥
ब्रह्मा सांगती नारदासी। देवऋषिवास वृक्षीं ॥५६॥

निष्ठापूर्वक सेवा करावी। पुण्याई वाढेल बरवी ॥
सर्व हेतू अश्वत्थ पुरवी। अविश्वास नको धरूं ॥५७॥

संगमीं अश्वत्थ वृक्षासी। सेवा करावी निश्चयेंसी ॥
आम्ही तेथे अनुष्ठानासी। करीत असतों सदोदित ॥५८॥

याच जन्मांत कन्यासुत। तुला होतील जाण सत्य ॥
मग गंगा वृद्धा सेवीत। गुरुआज्ञेसम पिंपळासी ॥५९॥

पूजा प्रदक्षिणा सेवा करीत। तीन दिवसांनीं स्वप्न होत ॥
ब्राह्मण येऊन सांगत। तुझें काम झालें असे ॥६०॥

गाणगापुरीं तूं जाऊन। श्रीगुरूचें घ्यावें दर्शन ॥
गुरु देतील तें भक्षण। करावें, गंगा आनंदली ॥६१॥

दुसरे दिनीं येत गावांत। गुरूला सद्भावें नमीत ॥
श्रीगुरु दोन फळें देत। व्रत पूर्ण कर म्हणती ॥६२॥

मग भक्षण फळें करावीं। त्यापरी वागे वृद्ध बरवी ॥
विप्रभोजनें व्रत संपवी। फल प्रसाद खात असे ॥६३॥

संध्याकाळीं अस्पर्श झाली। गंगा मानसीं संतोषली ॥
तीन दिवस विटाळ पाळी। चौथ्या दिवशीं शुद्ध बने ॥६४॥

पतिसह मग येऊन। घेतलें गुरूचें दर्शन ॥
भावें होत गुरुपूजन। आशीर्वचन लाभतसे ॥६५॥

आनंदें पातली घरासी। संगम पांचवे दिवशीं ॥
निसर्ग श्रीगुरुशब्दासी। अनुकूल कार्य करीतसे ॥६६॥

गंगा गरोदर राहिली। चोहोंकडे वार्ता फांकली ॥
ओटीं भरून योग्यकालीं। नारी वाणें वांटीतसे ॥६७॥

नवमास भरल्यावरी। कन्या प्रसवे गंगानारी ॥
सोमनाथ विविधपरी उत्सव तेव्हां करीतसे ॥६८॥

जननाशौच संपवून। घेतलें गुरूचें दर्शन ॥
कन्येस गुरु उचलून। कडे घेऊन सांगती ॥६९॥

होईल बहु पुत्रवती। दीक्षित-पत्नी भाग्यवती ॥
उभय कुलें उद्धरिती। दर्शना दक्षिण-महाराजा ॥७०॥

ऐकून आनंदे दंपती। आदरें पुत्रार्थ विनंती ॥
करितां गुरु आश्वासिती। पुढें विद्वान पुत्र जन्मे ॥७१॥

श्रीगुरु-प्रसादें पुत्र प्राप्ती। नांव नरसिंह ठेविती ॥
गुरुलीला अगाध म्हणती। कीर्ती अपार होतसे ॥७२॥

पांच पुत्र तो लाधला। नरसिंह ब्राह्मण भला ॥
संतति होत म्हातारीला। भक्त-वासना पुरताती ॥७३॥

एकदां एक कुष्टी ब्राह्मण। येऊन घाली लोटांगण ॥
म्हणे तीर्थे व्रतें कठीण। करूनही दुःखी असें ॥७४॥

सकाळीं न पाहाती मुख। पापी म्हणती तेणें दुःख ॥
आतां पुरे संसार-सुख। तवपदीं चित्त राहूं दे ॥७५॥

त्या नरहरी ब्राह्मणासी। सांगती गुरु सुखी होसी ॥
इतक्यांत कोणी सर्पणासी। औदुंबरखोड आणिलें ॥७६॥

कुजट शुष्क काष्ठ थोर। गुरु म्हणती घे लवकर ॥
रोंव संगमेश्वरा-समोर। पाणी घालून कर सेवा ॥७७॥



ज्या दिवशीं वृक्ष जिवंत। तेव्हां होसील कुष्ट मुक्त ॥
ऐकून तसें करी त्वरीत। गुरुवचनीं दृढ श्रद्धा ॥७८॥

उपाशीं विप्र सात दिवस। संगमेश्वरा अश्वत्थास ॥
पूजून या औदुंबरास। कलशें पाणी घालीतसे ॥७९॥

कित्येक म्हणती विप्रासी। तूं प्रयत्न वायां करिसी ॥
आतां पालवी या झाडासी। येणार नाहीं निश्चित ॥८०॥

तुझ्या पापा नाहीं उतार। म्हणून सांगती गुरुवर ॥
विप्र म्हणे मम निर्धार। अमृतवाणी गुरूची ॥८१॥

गुरूपाशीं शिष्य सांगती। ब्राह्मणाची अनन्यभक्ति ॥
गुरु म्हणती फलश्रुती। भावासारखी लाभेल ॥८२॥

गुरु-महिमा असे थोर। सूत सांगे सविस्तर ॥
पांचाळपुरीश कुमर। धनंजय गेला पारधीसी ॥८३॥

तृषाक्रांत फार होऊन। शबर दूतांसह फिरून ॥
शोधितां पाणी एक प्राचीन। शिव मंदीर सापडलें ॥८४॥

तेथें दुसरें एक लिंग। शबरें पाहून अभंग ॥
उचलून पाहातां सवेग। राजपुत्र तेथें पोंचला ॥८५॥

म्हणे शबरा काय करिसी। तो म्हणे ये स्वमानसीं ॥
पूजा करावी या लिंगासी। तरी विधान सांगावें ॥८६॥

धनंजय सर्व सांगत। बिल्वपत्रें फुलें श्वेत ॥
धूपदीपादि भक्तियुक्त। चिता-भस्म नैवद्यासी ॥८७॥

त्याप्रमाणें आपलें अन्न। भावें नैवेद्या समर्पून ॥
उमा शंकरास स्तवून। प्रसाद आपण सेवावा ॥८८॥

शबर संतोषे तें ऐकून । घरीं गेला लिंग घेऊन ॥
भावें करी शिवपूजन। नैवेद्य चिताभस्माचा ॥८९॥

एके दिनीं न मिळे भस्म। भार्ये सांगे चुकतो नेम ॥
गुरुआज्ञा पाळता क्षेम। तसें न घडे काय करूं ॥९०॥



पत्नी म्हणाली मी देईन । तुमची अर्धांगी असून ॥
चिंता कशाला निष्कारण। देह जाळून टाकावा ॥९१॥

भस्माचा नैवेद्य दाखवून। क्षेम पावा व्रत पाळून ॥
पति म्हणे अभद्र वचन। बोलूं नको प्रियकांते ॥९२॥

परंतु ती आग्रह धरी। तसें मग शबर करी ॥
पूजा करून हांक मारी। प्रसाद घेण्या शंकराचा ॥९३॥

भार्या मेली नसे स्मरण। ती येतसे ओ देऊन ॥
शबरा झाली आठवण। म्हणे धन्य ही शिवकृपा ॥९४॥

तत्काळ होत शिवदर्शन। दंपती गेली उद्धरून ॥
भावनेपरी येत घडून। श्रीगुरु तेव्हां सांगती ॥९५॥

शिष्यांसह संगमीं जाती। काष्ठावर तीर्थ शिंपती ॥
झाड जिवंत पर्णे येती। सुदेही विप्र बनलासे ॥९६॥

आनंदा नसे पारावर। विप्रा स्फुरण अनिवार ॥
स्तोत्र करी तो मनोहर। गुरु आशीर्वाद देती ॥९७॥

गुरुकृपेनें नरहरी। वास करी गाणगापुरीं ॥
गुरलोभ फार त्यावरी। योगेश्वर म्हणताती ॥९८॥

भक्तांसाठी तो वनमाळी । अवतरे कृपेनें भूतळीं ॥
भावबळानें भक्तमेळीं। दिसे सस्मित श्रीगुरु ॥९९॥

त्यांना जोडून हात दोन। त्रेपन्नावा अध्याय पूर्ण ॥
श्रीदत्त चरणीं अर्पण। करितां प्रसन्न श्रीगुरु ॥१००॥

श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु